आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com

वेर्णा, शुक्रवार, २० जून २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 288 | Verna, | facebook.com/dainikherald | Friday 20 June 2025 | Pages 4 | ₹ 4



मडगाव मास्टर प्लॅनला नागरिकांचा तीव्र विरोध पान ३ वर



गिल चौथ्या स्थानी तर पंत पाचव्या : नायरला दुखापत पान ४ वर

# 'होय ! हा निर्णय माझाच !'-मुख्यमंत्री

## गोविंद गावडेंच्या मंत्रीमंडळातून हकालपट्टीवर मुख्यमंत्र्यांची तीन शब्दात प्रतिक्रिया | मंत्रीमंडळ फेरबदलाची शक्यता

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि.१९ : गोविंद गावडे यांना मंत्रिमंडळातून वगळण्याचा निर्णय पूर्णतः माझा होता, अशी स्पष्ट आणि ठाम भूमिका मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनीमांडली. मंत्रिमंडळ फेरबदलाच्या चर्चांना गती देत त्यांनी हे विधान केले. अन्य कोणत्याही मंत्र्याच्या बदलाबाबत सध्या कोणताही निर्णय झालेला नसल्याचेही त्यांनी नमूद केले.**

कला, संस्कृती आणि क्रीडा खात्याचा कार्यभार पाहणाऱ्या गोविंद गावडे यांची अनपेक्षितपणे बुधवारी मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्यात आली. त्यांच्या जागी कोणता नवा चेहरा मंत्रिमंडळात सहभागी होणार, हे अद्याप गुलदस्त्यात आहे.

गावडे यांची मंत्रिपदावरून हकालपट्टी ही केवळ व्यक्तिक निर्णय नसून, पक्षाच्या कार्यपद्धतीत शिस्त व जबाबदारीचे नवे संकेत देणारी कारवाई म्हणून पाहिली जात आहे. या निर्णयामुळे मंत्रिमंडळातील काही सहकारी मंत्र्यांमध्ये चिंतेची लाट पसरली असून काही जण 'डॉक्यावर तलवार' लटकत असल्याच्या भावनेत आहेत.

हा निर्णय केवळ कार्यक्षमतेवर आधारित नव्हता, तर मुख्यमंत्री सावंत यांचा पक्षावरचा प्रभाव अधोरेखित करणारा होता. खुद्द बाबूश मोन्सेरात यांनीही आपल्या विधानात मी मंत्री आहे, कारण मुख्यमंत्री आहेत, असे म्हणत सावंत यांचा राजकीय वकूब अधोरेखित केला.

गावडे यांच्या जागी कोणाची वर्णी लागणार, याबाबत अनेक नावे चर्चेत आहेत. सभापती रमेश तवडकर, माजी मुख्यमंत्री दिगंबर कामत आणि आमदार संकल्प आमोणकर हे संभाव्य इच्छुक मानले जात आहेत. भाजपच्या राजकीय समीकरणांनुसार गावडे हे अनुसूचित जमातीचे (एसटी) प्रतिनिधी होते. त्यामुळे त्यांच्या जागी दुसरा एसटी नेता मंत्रिमंडळात घेण्याची शक्यता आहे. गणेश गावकर यांचे नावही यासाठी पुढे येत आहे.

क्रांतिदिनाच्या संध्याकाळी राज्यपाल पी. एस. श्रीधरन पिल्लई यांच्या स्वाक्षरीनंतर जारी अधिसूचनेत गावडे यांची मंत्रिपदावरून हकालपट्टी जाहीर झाली. या निर्णयामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली असून सत्ताधारी पक्षात अंतर्गत घडामोडी अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत.



गावडे यांच्याकडील क्रीडा, कला-संस्कृती आणि प्रादेशिक विकास प्राधिकरण ही महत्त्वाची खाती सध्या मुख्यमंत्र्यांकडे वर्ग करण्यात आली आहेत. याशिवाय शिक्षण, अर्थ, गृह, सार्वजनिक बांधकाम यांसारखी अनेक महत्त्वाची खाती आधीच सावंत यांच्याकडे आहेत. यामुळे मंत्रिमंडळ फेरबदल होईपर्यंत सारा प्रशासनिक भार मुख्यमंत्री स्वतः सांभाळतील.

२०२२ च्या निवडणुकीपूर्वी गावडे भाजपमध्ये दाखल झाले होते आणि प्रियोळ मतदारसंघातून मगोपचे अध्यक्ष दीपक ढवळीकर यांचा पराभव केला होता. आता मात्र त्यांची राजकीय गच्छंती भाजपच्या अंतर्गत रणनीतीचा भाग ठरली आहे. खुद्द ढवळीकर यांनी या घडामोडींवर प्रतिक्रिया देणे टाळले असून ही भाजपची अंतर्गत बाब आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

एसटी समाजासाठी कार्यरत उटा संघटनेचे अध्यक्ष प्रकाश वेळीप यांनी या घडामोडींवर प्रतिक्रिया नाकारली असली तरी, संघटना पुढेही आपल्या मागण्यांसाठी सक्रिय राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आणखी दोन ते तीन मंत्र्यांना डच्चू मिळू शकतो.

पान २ ▶

# प्रभू चेंबर्स प्रकरण: डिक्रीधारकांची ७.५ कोटींच्या वसुलीची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १९ :** म्हापसा येथील आगोंद भागातील वादग्रस्त प्रभू चेंबर्स' गृहनिर्माण प्रकल्पातील युनिटधारक डिक्रीधारकांनी बुधवारी उत्तर गोवा जिल्हाधिकारी कार्यालयात भेट देऊन प्रकल्प विकासकांकडून ७.५ कोटी रुपयांची वसुली करण्याची मागणी केली. ही रक्कम गोवा रिअल इस्टेट रेग्युलेटरी प्राधिकरण ('रेरा') मार्फत ठरवण्यात आलेल्या व्याज व भरपाईच्या स्वरूपात आहे.

प्रकल्पाचे बांधकाम २०१२ मध्ये सुरू झाले होते. मात्र, २०२५ उजाडले तरीही इमारत अपूर्ण आहे. अनेक वर्षांच्या विलंबामुळे त्रस्त झालेल्या युनिटधारकांनी म्हपसा नगरपरिषद आणि उत्तर गोव्याच्या प्रधान जिल्हा न्यायालयाच्या निर्देशांनुसार स्वतःच जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू केली होती.

सदर वसुली जमीन महसूल थकबाकीप्रमाणे केली जावी, अशी मागणी कायद्याच्या अनुषंगाने करण्यात आली आहे. यापूर्वी तत्कालीन जिल्हाधिकारी स्नेहा गित्ते यांच्या कार्यकाळात याच प्रकरणात विकासक प्रभू मोनी यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी करण्यात आले होते. त्यानंतर त्यांना अटकही करण्यात आली होती. मात्र, ११ एप्रिल २०२५ रोजीच्या आदेशानंतर त्यांची सशर्त मुक्तता करण्यात आली.

त्यानंतर, तिसवाडीचे मामलतदार यांना प्रधान जिल्हा न्यायालयाकडून वसुलीच्या रकमेची चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. २० मे २०२५ रोजी मामलतदारांनी दिलेल्या आदेशात डिक्रीधारकांनी सादर केलेल्या मोजणीला मान्यता देत, विकासकांकडून सादर करण्यात आलेल्या आकडेवारीला नाकारण्यात आले.

या पार्श्वभूमीवर, २२ मे २०२५ रोजी उत्तर गोवा जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेल्या अहवालाच्या आधारे, प्रभू मोनी यांना गोवा जमीन महसूल संहिता, कलम १२९ अंतर्गत कारणे दाखवा' नोटीस बजावण्यात आली होती. त्यांना ४ जून रोजी जिल्हाधिकाऱ्यांसमोर व्यक्तिगत सुनावणीसाठी हजर राहण्यास सांगण्यात आले होते.

तथापि, उत्तर गोवा प्रधान जिल्हा न्यायालयाने दिलेल्या ३० दिवसांत कार्यवाही पूर्ण करण्याच्या स्पष्ट निर्देशांना ७० दिवसांहून अधिक कालावधी लोटूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याने डिक्रीधारकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या विलंबाचा फायदा घेत डिफॉल्टर विकासक गायब होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

बैठकीदरम्यान, जिल्हाधिकाऱ्यांनी युनिटधारकांना आश्वासन दिले की, संपूर्ण प्रकरणावर योग्य कायदेशीर प्रक्रिया राबवून न्याय मिळवून देण्यासाठी पावले उचलली जातील आणि प्रकरण तार्किक व कायदेशीर निष्कर्षापर्यंत नेले जाईल.

## निवडक

### देशभरात ६८३६ कोरोनाचे रुग्ण सक्रिय

नवी दिल्ली, दि. १९ : देशभरातील सक्रिय रुग्णांची संख्या ६८३६ वर आली आहे. गेल्या ६ दिवसांत सक्रिय रुग्णांमध्ये २८५ ने घट झाली आहे. मागील २४ तासांत एकही नवीन रुग्ण आढळला नाही, तर ४२८ रुग्ण बरे झाले आहेत. केरळमध्ये सर्वाधिक १६५९ सक्रिय रुग्ण आहेत. आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, नवीन प्रकारामुळे आतापर्यंत १०९ जणांचा मृत्यू झाला आहे. केरळमध्ये सर्वाधिक ३५ जणांचा मृत्यू झाला आहे. महाराष्ट्रात २९ जणांचा मृत्यू झाला आहे. मध्यप्रदेशच्या इंदोरमध्ये उपचारादरम्यान २ कोविड रुग्णांचा मृत्यू झाला. हे दोन्ही रुग्ण खरगोन आणि रतलाम जिल्ह्यातील होते. इंदूरमध्ये ७१ सक्रिय रुग्ण आहेत. गेल्या २४ तासांत २ नवीन रुग्णांची नोंद झाली आहे. जूनमध्ये आतापर्यंत १०६ रुग्णांची नोंद झाली आहे.

### केदारनाथच्या मार्गावर अपघात, दोघांचा मृत्यू

**रुद्रप्रयाग, दि. १९ :** उत्तराखंडमधील रुद्रप्रयागमध्ये केदारनाथ धामला जाणाऱ्या ट्रेक मार्गावर भूस्खलन झाले. भूस्खलन होऊन डोंगरावरुन मातीचा ढिगारा आणि मोठे दगड कोसळले. जंगलचट्टी घाटाजवळील डोंगराच्या माथ्यावरून दगड - मातीचा ढिगारा खाली आला. या ढिगाऱ्याखाली दबून झालेल्या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला आणि तीन जण जखमी झाले. अपघाताच्या ठिकाणी मदतकार्य सुरू आहे. जखमींना रुग्णालयात दाखल केले आहे. याआधीही दोन दिवसांपूर्वी पावसामुळे केदारनाथ मार्गावर अपघात झाला होता.

केदारनाथ मार्गावर १८ जून रोजी सकाळी ११ वाजून २० मिनिटांनी जंगलचट्टी गधेरेजवळ डोंगरावरुन मातीचा ढिगारा आणि दगड कोसळले. या अपघातात पाच लोक ढिगाऱ्याखाली आले. घटनेची माहिती मिळताच तात्काळ जंगलचट्टी येथील पोलिसांनी आणि डीडीआरएफची टीम घटनास्थळी दाखल झाली. मदतकार्य सुरू झाले. ढिगाऱ्याखाली दबलेल्या पाच जणांना बाहेर काढण्यात आले. यापैकी दोघांचा मृत्यू झाला होता आणि इतर तीन जण जखमी होते. केदारनाथ भागात मोठा पाऊस सुरू आहे. सततच्या पावसामुळे मार्गावर अनेक ठिकाणी अपघात होण्याचा धोका वाढला आहे.

### भारताच्या अर्थव्यवस्थेची वेगानं घोडदौड

**नवी दिल्ली, दि. १९ :** भारत ाची अर्थव्यवस्था खूप वेगाने वाढत आहे. लवकरच भारत जपानला मागे टाकून चौथ्या क्रमांकावर येईल. पण, एक मोठी समस्या आहे. ती म्हणजे, हुशार भारतीय लोक चांगले पैसे कमवण्यासाठी बाहेरच्या देशात जात आहेत. अर्थात, भारत भांडवलशाहीबद्दल बोलतो. पण, इथले चांगले लोक दुसऱ्या देशांमध्ये जाऊन पैसे कमवत आहेत. फिनटेक इन्फ्लुएंसर अक्षत श्रीवास्तव याला 'बाजाराच्या नावाखाली क्रोनी सोशलिझम' म्हणतात. अक्षत श्रीवास्तव विजडम हॅचचे संस्थापक आहेत. त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर एक पोस्ट टाकली. त्यात ते म्हणाले की, भारतात गुणवत्ता आहे. पण, इथले महत्त्वाकांक्षी लोक विदेशात किंवा मोठ्या शहरांमध्ये जाऊन राहतात. कारण भारताची आर्थिक रचना अजूनही समाजवादी आहे. जर खरी भांडवलशाही स्वीकारली, तर लोक आपल्या कुटुंबासोबत आणि संस्कृतीसोबत राहतील.

अक्षत श्रीवास्तव यांनी त्यांचे म्हणणे सोप्या पद्धतीने समजावण्यासाठी काही उदाहरणे दिली. ते म्हणाले की, केरळमधून २१ लाखांपेक्षा जास्त लोक आखाती देशांमध्ये काम करतात. त्यांनी २०२३ मध्ये १.२५ लाख कोटी रुपये पाठवले. हे राज्य जीडीपी च्या जवळपास ३०% आहे. बिहारची लोकसंख्या भारताच्या ९% आहे.

# गोव्याची शालेय शिक्षणातील कामगिरी मध्यम'; दक्षिण गोवा उत्तर गोव्याच्या पुढे

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १९ :** केंद्रीय शिक्षण मंत्रालय, नवी दिल्लीने नुकताच जाहीर केलेल्या कामगिरी श्रेणी निर्देशांक २०२३-२४ च्या अहवालानुसार, गोव्याची शालेय शिक्षणातील एकूण कामगिरी मध्यम' श्रेणीत' आहे. राज्यातील दक्षिण गोवा जिल्ह्याची कामगिरी उत्तर गोव्याच्या तुलनेत थोडीशी सरस असल्याचे या अहवालातून स्पष्ट झाले आहे.

पीजीआय -डी चा हा अहवाल शालेय शिक्षणाच्या सहा मुख्य क्षेत्रांतील ७४ निर्देशकांच्या आधारे तयार केला गेला आहे. दक्षिण गोव्याने ३११ गुणांसह प्रचार १' मध्ये स्थान पटकावले, तर उत्तर गोव्याला ३०० गुण मिळून प्रचार २' मध्ये स्थान देण्यात आले.

एकूणच, दोन्ही जिल्ह्यांची कामगिरी बऱ्यापैकी सारखी असूनही, शैक्षणिक निकालांमध्ये दक्षिण गोव्याने उल्लेखनीय आघाडी घेतल्याचे निरीक्षणात आले आहे.

राष्ट्रीय पातळीवर चंदीगड, पंजाब, दिल्ली, गुजरात आणि ओडिशा या राज्यांनी किंवा केंद्रशासित प्रदेशांनी कामगिरी श्रेणी निर्देशांक २०२३-२४मध्ये सर्वोत्तम कामगिरी केली आहे. ६०० गुणांच्या एकूण संधींमध्ये, या राज्यांनी इतरांना मागे टाकत शालेय शिक्षण व्यवस्थेतील आपली गुणवत्ता सिद्ध केली.

अहवालात एका सकारात्मक बदलाची नोंद घेतली गेली आहे. २०१७-१८ मध्ये भारतातील राज्यांमधील शैक्षणिक कामगिरीतील कमाल तफावत ५१% इतकी होती, ती २०२३-२४ मध्ये घटून ४१% वर आली आहे. म्हणजेच गेल्या सहा वर्षांत राज्यांमधील शैक्षणिक असमानता कमी झाली आहे.

पीजीआय प्रणालीमुळे राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये शालेय शिक्षणाच्या बाबतीत कामगिरीतील अंतर भरून काढण्यासाठी महत्त्वाची मदत झाली आहे, असे या केंद्रीय अहवालात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.

हा अहवाल गोव्यासाठी संधी आणि आव्हान दोन्ही दर्शवतो. शिक्षण क्षेत्रात अधिक गुंतवणूक, शिक्षक प्रशिक्षण, विद्यार्थ्यांचे मूल्यमापन आणि आधुनिक डिजिटल पान २ ▶

# चिखलीतील 'डब्ल्यूओओडब्ल्यू' प्रकल्प शाश्वत कचरा व्यवस्थापनाचे मॉडेल

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १९ :** राज्यात तळागाळात शाश्वत कचरा व्यवस्थापनाला चालना देण्याच्या उद्देशाने चिखली येथील वेल्थ आउट ऑफ वेस्ट ('डब्ल्यूओओडब्ल्यू') या प्रगत प्रक्रिया प्रकल्पाला आप चे आमदार क्रूझ सिल्वा यांनी गुरुवारी भेट दिली. या दौऱ्यात त्यांनी वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांसह वेळ्ळी मतदारसंघातील सरपंच, पंचायत सदस्य आणि सचिवांसह एक अभ्यास दौरा केला.

या अभ्यास दौऱ्यामागील उद्दिष्ट चिखली ग्रामपंचायतीने स्वीकारलेल्या नवकल्पनाशील कचरा व्यवस्थापन प्रक्रियेची प्रत्यक्ष पाहणी करून, तिच्या संपूर्ण गोव्यात पुनरावृत्ती करण्याच्या शक्यता तपासणे हे होते. या वेळी पंचायत उपसंचालक, *गटविकास अधिकारी आणि इतर स्थानिक प्रतिनिधी उपस्थित होते.

साइट टूर दरम्यान, 'डब्ल्यूओओडब्ल्यू' प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव पोकळे यांनी उपस्थित प्रतिनिधींना सादरीकरण करताना प्रकल्पाची कार्यपद्धती, वर्गीकरण, प्रक्रिया आणि पुनर्वापरावर आधारित वैज्ञानिक दृष्टिकोन स्पष्ट केला.पोकळे यांनी सांगितले की, पंचायत स्तरावर शाश्वत कचरा व्यवस्थापनाची गरज आता केवळ पर्यावरणपूरकतेपुरती मर्यादित नाही, तर ती सामाजिक जबाबदारी देखील आहे.

'डब्ल्यूओओडब्ल्यू' प्रकल्पाची एक वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे, प्रक्रिया केलेले पाणी चिखली मधील जॉगर्स पार्कच्या सिंचनासाठी वापरण्यात येते. यामुळे वर्तुळाकार अर्थव्यवस्था आणि जलसंवर्धनाचा मूर्त उदाहरण म्हणून हा प्रकल्प उभा राहतो, असे पोकळे यांनी नमूद केले.

साइट टूरनंतर चिखली पंचायत सभागृहात आयोजित संवाद सत्रात, शिष्टमंडळातील प्रतिनिधींनी गोव्यातील इतर पंचायत स्तरावर 'डब्ल्यूओओडब्ल्यू' मॉडेल राबविण्याच्या शक्यता तपासल्या.

या चर्चेत सामुदायिक सहभाग, *पायाभूत सुविधा उभारणी, आणि निधी उपलब्धतेचे पर्याय यावर विशेष भर देण्यात आला. विकेंद्रित कचरा व्यवस्थापनाच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी आणि स्थानिक स्तरावर उभारल्या जाणाऱ्या यंत्रणांवर सहभागींनी विचार मांडले.

आमदार क्रूझ सिल्वा यांनी चिखली प्रकल्पाचे कौतुक करताना तो स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी एक आदर्श मॉडेल असल्याचे सांगितले. ही केवळ एक प्रक्रिया सुविधा नसून, संपूर्ण पंचायत आणि गावकऱ्यांच्या सहभागातून साकारलेले शाश्वत व्यवस्थापनाचे यशस्वी उदाहरण आहे, असे ते म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, गोव्याच्या प्रत्येक पंचायत क्षेत्रात असे उपक्रम राबविले गेले पाहिजेत. यामुळे स्वच्छता, पर्यावरण रक्षण आणि संसाधनांचा पुनर्वापर अशा तिन्ही पातळ्यांवर सकारात्मक परिणाम साधता येईल.

चिखली डब्ल्यूओओडब्ल्यू' प्रकल्प हा फक्त कचरा प्रक्रिया करणारा युनिट नसून, पर्यावरणीय शाश्वततेचा पान २ ▶

# इस्रायल-इराण संघर्षात तणाव शिगेला; नेतन्याहूंचा इशारा, खामेनींचा निर्धार

## इस्रायल-इराण संघर्ष जागतिक शक्तींमधील सामरिक संतुलनाला मोठे आव्हान

तेल अवीव/तेहरान, दि. १९ :

इस्रायलविरुद्ध सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांनी आपल्या जनतेला धैर्याने आणि निर्धाराने पुढे जाण्याचे आवाहन केले आहे. जर शत्रूला तुमचा भीती वाटतोय हे कळले, तर तो तुम्हाला कधीच माफ करणार नाही, असे त्यांनी सोशल मीडियावरून स्पष्ट केले. आजवर तुम्ही जसे खंबीर राहिलात, तसेच पुढेही रहा, असा संदेश त्यांनी दिला.

दरम्यान, इराणचे उप-परराष्ट्रमंत्री सईद खतीबजादेह यांनी सांगितले की, अमेरिका आणि इराण आण्विक कराराच्या अंतिम टप्प्यावर होते. मात्र, इस्रायलच्या अचानक सुरू झालेल्या हल्ल्यामुळे ही चर्चा मोडीत निघाली. इराणने १५ जून रोजी अमेरिकेसोबतच्या प्रस्तावित चर्चांना स्थगिती देत इस्रायलला प्रत्युत्तर देण्याची भूमिका घेतली होती.

१८ जून रोजी इराणने इस्रायलवर क्षेपणास्त्रांचा मारा केला. यामध्ये बेर्शेबा येथील सोरोका रुग्णालयाला नुकसान झाले असून किमान ३२ नागरिक जखमी झाले आहेत. इस्रायल सरकारने या हल्ल्याला 'नागरिकांवर उद्दिष्ट ठेवलेला दहशतवादी हल्ला' असे संबोधले आहे.



पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी 'एक्स'वर (पूर्वीचे ट्विटर) लिहिले की, इराणच्या दहशतवादी हुकूमशहांनी बेर्शेबा येथील रुग्णालयावर क्षेपणास्त्र डागले. याची इराणला मोठी किंमत चुकवावी लागेल.

इस्रायल लष्कराच्या माहितीनुसार, इराणने डझनभर क्षेपणास्त्रांचा वापर करून नागरिकवस्ती आणि महत्त्वाच्या ठिकाणांना लक्ष्य केले. अमेरिकेच्या आपत्कालीन सेवा संस्था मॅगन डेव्हिड एडोम ने ३२ जखमींवर उपचार सुरू असल्याचे सांगितले आहे.

दरम्यान, अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी १७ जून रोजी रात्री इराणविरोधात लष्करी कारवाईची योजना मंजूर केली होती. मात्र, अंतिम निर्णय अद्याप घेण्यात आलेला नसल्याचे सूत्रांनी सांगितले. गुप्तचर संस्थांच्या माहितीनुसार, जर इराणने अणु कार्यक्रम थांबवण्याची तयारी दाखवली, तर ही योजना स्थगित होऊ शकते.

व्हाईट हाऊसने ट्रम्प यांच्या जी -७ परिषदेतून लवकर निघण्यामागे मध्यपूर्वेतील परिस्थिती हे कारण दिले. मात्र ट्रम्प यांनी सोशल मीडियावर स्पष्ट केले की, या परिस्थितीचा त्यांच्या अचानक परतण्याशी काहीही संबंध नाही.

इस्रायलचे पंतप्रधान नेतन्याहू यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, राणच्या अणुथ्रेटचा पूर्णपणे नायनाट करणे हेच आमचे उद्दिष्ट आहे. त्यांनी दावा केला की, इराणच्या अणुकार्यक्रमावर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला असून, ऑपरेशनच्या शेवटी इस्रायलसमोर कोणताही अणु किंवा बॅलिस्टिक धोका उरणार नाही.

खामेनी संभाव्य लक्ष्य आहे का, असा प्रश्न विचारल्यावर नेतन्याहू म्हणाले, कोणीही सुरक्षित नाही.यावेळी त्यांनी ट्रम्प यांच्याशी जवळचा संपर्क असल्याचे सांगून त्यांचे कौतुकही केले. ते दररोज जवळपास संपर्कात असतात. त्यांच्या निर्णयक्षमतेवर मला विश्वास आहे,असे नेतन्याहू म्हणाले.

दरम्यान, रशियाचे राष्ट्रपती कार्यालयाने या संघर्षात अमेरिकेच्या हस्तक्षेपाबाबत चिंता व्यक्त केली आहे. क्रेमलिनचे प्रवक्ते दिमित्री पेस्कोव्ह यांनी टीएएसएस वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले की, युद्धात अमेरिकेचा हस्तक्षेप म्हणजे आणखी एक भयंकर टप्पा उघडण्यासारखे आहे.

रशिया आणि अमेरिका संघर्षाच्या विरुद्ध बाजूंना उभे आहेत. रशिया इराणचा प्रमुख सहयोगी असून, युक्रेन युद्धासाठी इराणकडून शाहेद ड्रोन विकत घेतले आहेत. रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने इस्रायलच्या कारवायांचा निषेध करत त्यांना अनावश्यक आणि उकसवणारे म्हटले आहे.

रशियाचे उप-परराष्ट्रमंत्री सर्गेई रियाबकोव्ह यांनी अमेरिकेला आवाहन केले आहे की, इस्रायलला लष्करी मदत देऊ नये. अन्यथा ही संपूर्ण स्थिती नाटकीयरित्या अस्थिर होईल.

दरम्यान, युद्धग्रस्त इराणमधून भारतीय नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्याची प्रक्रिया सुरू असून, पहिलं विमान ११० भारतीय विद्यार्थ्यांना घेऊन गुरुवारी पहाटे दिल्लीला दाखल झालं.

इस्रायल-इराण संघर्ष आता जागतिक शक्तींमधील सामरिक संतुलनाला मोठे आव्हान ठरत असून, येत्या काही दिवसांत याचे गंभीर परिणाम दिसून येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.